# ।। कुंडा पंथी के संवाद ।।
# मारवाडी + मराठी
✻

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## ।। अथ कुंडा पंथी के संवाद लिखंते ।।

।। कवत ।।

कुळ कारण मरजाद ।। जोय पसु वन के नांही ।।
अेकण कुंडे पीछ ।। सरब खाणा संग खाही ।।
भोग विलास न भ्रम ।। बेन माई नही जाणे ।।
ज्यां पुळ बरते रीत ।। ताय सुं ही संगम ठाणे ।।
लख चोरासी जीव के ।। भिन्न भाव नही माय ।।
सुण पंथी सुखराम के ।। मोख कुण सा जाय ।।१।।

(हे कुंडापंथी कुळाचे कारण आणि मर्यादा काहीही ठेवीत नाही.कोणाच्याही स्त्रीला कोणीही पुरुष भोग करू शकतो,ती स्त्री नात्यातील असो किंवा गोत्राची असो वा जातीची असो किंवा दुसऱ्या जातीची असो वा दुसराही पुरुष असो,हे संभोग करण्यात कोणते कारण नाही ठेवत आणि एक दुसऱ्याची मर्यादाही ठेवत नाही,हे सर्व ब्राम्हण पासून तर,शुद्र,मांग,मेहतरपर्यंत एकाच कुंडीत मांस-मासे आणि दारू खातात-पितात आणि भोग विलास करतात,आई किंवा बहिणीलाही जाणत नाही,ज्यावेळी स्त्रीसी प्रसंग होतो,त्यावेळी त्या स्त्रीसी भोग करून घेतात,यांच्या करीता म्हणजे कुंडापंथी वाल्यांकरीता आदि सतगुरू सुखरामजी महाराज बोलले,अरे,हे तुमच्यासारखे चौऱ्याशी लक्ष योनीचे जीव,जंतू,पशु-पक्षी हे सर्व वेगळे भाव ठेवत नाही,तर हे पशु-पक्षी सर्वही तुमच्या सारखे वर्तन करतात,चौऱ्याशी लक्ष योनीचे जीव भोग करण्यात,कुळाचे कारण आणि मर्यादा,नाते,संबंध तुमच्यासारखे काहीच ठेवत नाही,हे सर्व जातीचे जीव एकाच भांड्यात एकाच ठिकाणी पाणी पितात आणि सर्व जातीचे जनावर तुमच्या सारखेच एकाच जागी(जागेवर)खातात.हे जीवही आई किंवा बहिणीसी भोग करतात,तसेच तुमच्या सारखे भ्रम व कारण मानत नाही,ज्यावेळी ज्याच्याशी प्रसंग येतो,त्यावेळी त्याच्याशी तुमच्या सारखी रीती पाळून संभोग करून घेतात,अशाप्रकारे चौऱ्यांशी लक्ष योनीच्या जीवामध्ये ही तुमच्या सारखा भिन्न भाव नाही आहे,तर कुंडापंथी ऐका,या चौऱ्यांशी लक्ष योनीच्या जीवांमध्ये कोणी मोक्षाला जातो काय,ते बोला?

।। इति कुंडा पंथी को संमाद संपूरण ।।